मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरात 25 चौकांत सर्वाधिक "कोंडी"

## प्रशासनाच्या उपाययोजना : सहा महिन्यांत वाहतूक सक्षमीकरणाचे "टार्गेट"



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढत्या वाहतूककोंडीमुळे पिंपरी-चिंचवड महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी शहरातील ८० चौकांची पाहणी केली असता, २५ चौकांत सर्वाधिक वाहतूककोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. आता या चौकांतील वाहतूक सुरळीत करण्यासाठी महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाने उपाययोजना हाती घेतल्या असून, पुढील सहा महिन्यांत कोंडीमुक्ती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

औद्योगिकनगरी असलेल्या पिंपरी-चिंचवड परिसरात अनेक कारखान्यांसह हिंजवडी, तळवड्यातील माहिती तंत्रज्ञाननगरी, देहू-आळंदी तीर्थक्षेत्र, नामांकित शाळा, महाविद्यालये आहेत. त्यामुळे वाहनांची संख्याही अधिक असते. बेशिस्त वाहनचालक, रस्त्यालगतची अतिक्रमणे अशा कारणांमुळे सकाळी आणि सायंकाळी अनेक रस्त्यांवर वाहतूककोंडी होते. या कोंडीमुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर, वाहतूक विभाग आणि महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरीत्या ८० चौकांची पाहणी केली. त्यानंतर तीन वेळा बैठकांमध्ये चर्चा करून सतत वाहतूककोंडी होणारे २५ चौक निश्चित करण्यात आले आहेत. आता संबंधित चौकातील वाहतूककोंडी सोडवण्यासाठीच्या उपाययोजनांची चाचपणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाने शंभर दिवसांत विविध कार्यक्रम ठरवून दिले आहेत. या कार्यक्रमानुसार वाहतूककोंडीच्या २५ चौकांपैकी पहिल्या टप्प्यात नऊ चौकांतील कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. संबंधित चौकांत वाहतूक पोलिसांकडून मदतनीस, वाहतूक नियंत्रण दिवे (सिग्नल) बदल करणे, एकेरी वाहतूक करणे, चौकात वाहतुकीच्या दृष्टीने बोलार्ड बसविणे, मार्गात बदल असे उपाय करण्यात येणार आहेत.

**पादचाऱ्यांसाठी 'स्पीड' टेबल**

शहरातील विविध चौक मोठ्या आकाराचे आहेत. त्यामुळे अशा चौकांत वाहतूककोंडीही अधिक प्रमाणात होत असल्याचे पाहणीतून निदर्शनास आले आहे. अशा मोठ्या चौकांमध्ये विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी 'स्पीड टेबल' तयार करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

**वाहतूककोंडीचे 25 चौक**


» भारतमाता चौक, गोडाउन चौक, देहू फाटा, बोऱ्हाडेवस्ती चौक, चिखली चौक, त्रिवेणीनगर चौक, डांगे चौक, वाकड चौक, काळा खडक रोड, भूमकर चौक, फिनिक्स मॉल परिसर, भुजबळ चौक, ताथवडे भुयारी मार्ग, पुनावळे भुयारी मार्ग, लक्ष्मी चौक, थरमॅक्स चौक, टिळक चौक, खंडोबा माळ चौक, फिनोलेक्स चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नाशिक फाटा, दापोडी चौक, भोसरी बसस्थानक, तळवडे चौक, गणेशनगर चौक या चौकात सर्वाधिक वाहतूककोंडी होत असल्याचे दिसून आले आहे.

"शहरातील ८० चौकांची पाहणी केल्यानंतर वाहतूककोंडीचे २५ चौक निश्चित करण्यात आले. सुरुवातीला नऊ चौकांतील कोंडी सोडविण्यासाठी काम केले जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने उर्वरित चौकांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. पुढील सहा महिन्यांत संबंधित चौक कोंडीमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे.

**- बापुसाहेब गायकवाड, सह शहर अभियंता, शहरी दळणवळण विभाग.**

# चिंचवड पोस्टला मुख्य टपाल कार्यालयाचा दर्जा

## खासदार बारणे यांच्या पाठपुराव्याला यश : केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचा निर्णय




**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील 25 वर्षापासून पिंपरी-चिंचवडकरांसाठी व टपाल कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असलेल्या चिंचवड पूर्व उपपपाल कार्यालयाचा मुख्य टपाल कार्यालयामध्ये समावेश करण्यात आला आहे. यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेत केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी चिंचवड पोस्टला मुख्य टपाल कार्यालयाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा आदेश गुरुवारी प्राप्त झाला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व उपटपाल कार्यालय पुणे स्टेशन येथील मुख्य कार्यालयाअंतर्गत जोडली होती. त्यामुळे शहरातील 35 उपटपाल कार्यालयांचा कार्यभार पुणे स्टेशन येथील मुख्य टपाल कार्यालयामध्ये समावेशित करण्यात येत होता. टपाल कार्यालयासाठी लागणारे पैसे पुणे कार्यालयातून पोहोचवले जात होते. त्यात वेळ जात होता. नागरिकांची सर्व काम होत नव्हती. अधिकार मर्यादित होते.

चिंचवड टपाल कार्यालयाला मुख्य टपाल कार्यालयाचा दर्जा देण्याची मागणी राष्ट्रीय डाक कर्मचारी संघटन वर्ग 3 चे महाराष्ट्र व गोवा परिक्षेत्राचे सहाय्यक क्षेत्रीय सचिव काळुराम पारखी यांनी अडीच महिन्यांपूर्वी खासदार बारणे यांच्याकडे केली होती. खासदार बारणे मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेतली.

मावळ लोकसभा कार्यक्षेत्रामध्ये सर्व प्रशासकीय कार्यालयांची मुख्यालय सद्यस्थितीत अस्तित्वात येत आहेत. त्यामुळे एक मुख्य टपाल कार्यालय देखील असावे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या वाढत आहे. टपाल कार्यालयात लोकांची मोठी कामे असतात. मुख्य टपाल कार्यालय शहरात नसल्याने नागरिकांना पुण्यात जावे लागते. त्यासाठी चिंचवड पूर्व उपटपाल कार्यालयाचा मुख्य टपाल कार्यालयामध्ये समावेश करण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली. त्याची तत्काळ दखल घेत मंत्री सिंधिया यांनी मुख्य टपाल कार्यालयामध्ये समावेश करण्याची सूचना अधिकाऱ्यांना केली. त्यानुसार चिंचवड पूर्व उपटपाल कार्यालयाचा मुख्य टपाल कार्यालयामध्ये समावेश झाल्याचा आदेश गुरुवारी प्राप्त झाला आहे.

# पीएमपीतील कामकाजात मराठी बंधनकारक!

## पीएमपीचे सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर यांचे सक्तीचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमपीमधील सर्व कामकाज आणि लिखापढीची कार्यालयीन कामे मराठी भाषेतच करा. पीएमपीतील काम आता मराठी भाषेतच व्हायला पाहिजे, असे सक्त आदेश पीएमपीचे सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर यांनी दिले आहेत. कडक शिस्तीनंतर आता नार्वेकर यांनी आपला दुसरा पॅटर्न लागू केला असून, पीएमपीतील कामकाजात मराठी भाषा बंधनकारक केली आहे.



पीएमपीच्या ताफ्यात सुमारे दहा हजारांपेक्षा अधिक अधिकारी, कर्मचारी आहेत. त्यांच्यामार्फत पीएमपीचा कारभार चालवला जात आहे. हाच कारभार आणखी शिस्तबध्दपणे चालावा, याकरिता पीएमपी सहव्यवस्थापकीय संचालक नार्वेकर सक्त नियम लागू करत आहेत. यामुळे प्रशासनाचे कामकाज शिस्तबध्द होत असून, वेळेत होत आहेत. याचा सकारात्मक परिणाम आगामी काळात पाहायला मिळणार असल्याचा विश्वास पीएमपीच्या वर्तुळातून व्यक्त केला जात आहे.

तसेच कार्यालयातील नामफलकावर एखादी व्यक्ती/अधिकारी/कर्मचारी यांचे नाव मराठी भाषेमध्ये असणे आवश्यक आहे. कार्यालयीन नामफलकांवर एखादी व्यक्ती/अधिकारी/कर्मचारी यांचे नाव मराठी भाषेत लिहिताना इंग्रजी आद्याक्षरांचे भाषांतर न करता मराठीतूनच लिहावे. तसेच कार्यालयातील निविदा, ठेकेदारांशी केलेले करार/वेगवेगळ्या कंपन्या/आस्थापनांशी केलेले करार राजभाषा अधिनियम 1964 नुसार हे सर्व मराठी भाषेतून करावे.

### असा आहे आदेश

» पुणे महानगर परिवहन महामंडळातील सर्व विभागप्रमुख, आगार व्यवस्थापक कर्मचाऱ्यांना पुनःश्च कळविणे येते की, प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यात यावा. सर्व पत्रव्यवहार, कार्यालयातील कामकाज, सर्वसामान्यांपर्यंत जाणारे सर्व नमुने, पत्रके, परवाने, नोंदवह्या, प्रमाण नमुने, प्रपत्रे, विभागीय नियम पुस्तिका, सर्व प्रकारच्या टिपण्या, नसत्या, शेरे, अभिप्राय, आदेश, अधिसुचना, प्रारूप नियम, कार्यालय परिपत्रके, करारनामे, अहवाल, बैठकांची इतिवृत्त, इत्यादी मराठी भाषेमध्ये करणे आवश्यक आहे.

“ शासन आदेशानुसार महामंडळातील सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख कर्मचारी यांनी दिलेल्या सूचनांनुसार मराठीतून कामकाज करावे. राजभाषा अधिनियम 1964 नुसार कार्यालयीन कामाकाजासह अंतर्गत सर्व कामकाज मराठीतच करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

- नितीन नार्वेकर, सहव्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.

# “ॲक्शन प्लॅनला” ला अतिरिक्त आयुक्तांचा “बुस्टर”

## विविध विभागांना भेट : शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमाचा घेतला आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी राज्य सरकारच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम आखला आहे. या अनुषंगाने प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी गुरुवार (२० फेब्रुवारी) रोजी महानगरपालिकेच्या विविध विभागांना भेट देत तेथील विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी नागरिकांना दिल्या जाणाऱ्या ऑनलाईन सेवांची सज्जता आणि सर्व कार्यालयांची सर्वकष स्वच्छता मोहीम यावर भर देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.



याप्रसंगी भांडार विभागाचे उप आयुक्त निलेश भदाणे, उद्यान विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल भालसाखळे, स्थापत्य विभागाचे अभियंता बाळासाहेब शेटे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी दिपक पवार यांच्यासह संबंधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने तयार केलेल्या शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमामध्ये महानगरपालिकेचे संकेतस्थळ सुसज्ज करणे, महानगरपालिका मुख्यालयासह सर्व कार्यालयांमध्ये सर्वकष स्वच्छता मोहीम राबवून अनावश्यक गोष्टी काढून टाकणे, नागरिकांच्या तक्रारींचे जलद निवारण करणे, महानगरपालिका क्षेत्रात उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य करणे, त्यांच्यासाठी आखण्यात आलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणे, अशा विविध बाबींवर भर देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या सर्वच विभागांमध्ये काम सुरू करण्यात आले आहे.

### विभाग स्तरावर काटेकोर नियोजन करा..

» शंभर दिवसांच्या या कृती कार्यक्रमांतर्गत शिक्षण विभाग, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, स्थापत्य विभाग, विद्युत विभाग, पाणी पुरवठा विभाग, करसंकलन व कर आकारणी विभाग येथे आतापर्यंत कशा पद्धतीने काम करण्यात आले आहे, याचा आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट यासर्व विभागांना भेट दिली. तसेच कृती कार्यक्रमाचे काटेकोर आयोजन आणि यशस्वी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांचे जीवन सुखकर करण्यास प्राधान्य देणे आपल्या मुलभूत कर्तव्यांचा महत्त्वाचा भाग असून त्यासाठी सर्व विभागांनी आपापल्या स्तरावर काटेकोर नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

“ शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कमीत कमी कालावधीत कार्यालयीन कामकाज पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या सर्व विभागात हा कृती कार्यक्रम राबवण्यात येत आहे. कृती कार्यक्रमांचा आढावा सातत्याने घेण्यात येत असून त्यासाठी प्रत्यक्ष विभागात भेटी देण्यात येत आहेत.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# आयुक्तांना दिसेना अनधिकृत बांधकामे? रेडझोनमध्ये दररोज भूखंड विक्री

## चिखली, कुदळवाडीतील अतिक्रमण कारवाई ही सगळ्यात मोठी असली तरीही शहरातील अन्य अनधिकृत बांधकामे आयुक्तांना दिसत नसल्याची चर्चा



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरु आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या कारभारात राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. चिखली, कुदळवाडीतील अतिक्रमण कारवाई ही सगळ्यात मोठी असली तरीही शहरातील अन्य अनधिकृत बांधकामे आयुक्तांना दिसत नसल्याची चर्चा शहरात सर्वत्र सुरु आहे.

सत्ताधारी आमदारांसह स्थानिक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांच्या अधिकाऱ्यांसह निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकल्याचे मागी काही दिवसांत स्पष्ट झाले आहे. मात्र, शहरातील पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पुररेषेतील बांधकामे, नैसर्गिक ओढे-नाल्यावरील अतिक्रमण, अनधिकृत हॉटेल, रुफटॉप आणि तळवडे भागातील अनधिकृत कंपन्या, पत्राशेड, रेडझोनमधील टोलेजंग इमारतीवरच्या कारवाईला ब्रेक लागला आहे.

चिखली कुदळवाडीत महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने सर्वात मोठी कारवाई करत ८३० एकर भूखंड रिकामा करत सुमारे साडेचार हजार दुकाने, गोदामे, बांधकामे, इतर व्यावसायिकावर कारवाई केली. या कारवाईने महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून राजकीय दबावाखाली एका विशिष्ट समाजाला टार्गेट करुन कारवाई केल्याचा आरोप होवू लागला आहे. मात्र, हा आरोप आयुक्तांकडून फेटाळला असून अनधिकृत दुकाने, हवा आणि जल प्रदूषणामुळे ही कारवाई केल्याचे आयुक्त शेखर सिंह सांगत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी नदीच्या पात्रालगत, पूररेषेच्या जागेतच राजकीय नेत्यांच्या आशिर्वादाने अनधिकृत प्लॉटिंग, निवासी व व्यावसायिक बांधकामे करण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. नदीकाठच्या पुररेषेत पाटबंधारे व पालिका अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण वाटाघाटीमुळे बांधलेले गृहप्रकल्प, नदीकाठावर राडारोडा टाकून बांधलेले पत्राशेड, बेकायदेशीर बांधकामे बांधली आहेत. तसेच शहरात मुसळधार पाऊस झाल्यानंतर अनेक रस्त्यावर आणि सखल भागात पाणी साठून पुरसदृश्य परस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे शहरातील नैसर्गिक नाले, ओढ्यावर असलेले अतिक्रमण काढण्यात येणार होते. याकरिता महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी ॲक्शन प्लॅन बनवला आहे. आठ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत प्रत्येकी एक नाल्यांवरचे संपुर्ण अतिक्रमण व बांधकाम काढण्यात येणार होते.

### नोटीस दिल्या, मग कारवाई का होत नाही?

» पिंपरी-चिंचवड शहरात सर्वत्र हॉटेल, रेस्टॉरंट, बार आणि इतर व्यावसायिक इमारतींची संख्या मोठी आहे. शहरातील हॉटेल, बार, पब यांच्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचे अतिक्रमण विभागाने केलेल्या पाहणीत आढळून आले. या शहरातील ९० हॉटेल, बार, पब मध्ये मंजूर बांधकामांपेक्षा अधिक बांधकामे, प्रत्यक्षात जागेच्या वापरात बदल, अशा प्रकारच्या अनियमितता आढळून आल्या आहेत. त्या हॉटेल, बार, पबवर महापालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही.

### अनधिकृत हॉटेलवर कारवाई कधी?

» पिंपरी-चिंचवड शहरात सर्वत्र हॉटेल, रेस्टॉरंट, बार आणि इतर व्यावसायिक इमारतींची संख्या मोठी आहे. शहरातील हॉटेल, बार, पब यांच्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचे अतिक्रमण विभागाने केलेल्या पाहणीत आढळून आले. या शहरातील ९० हॉटेल, बार, पब मध्ये मंजूर बांधकामांपेक्षा अधिक बांधकामे, प्रत्यक्षात जागेच्या वापरात बदल, अशा प्रकारच्या अनियमितता आढळून आल्या आहेत. त्या हॉटेल, बार, पबवर महापालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही.

### कर्मचाऱ्यांवर कारवाई कधी?

» अवैध बांधकामे, अतिक्रमणे होऊ नयेत म्हणून उच्च न्यायालयाच्या परवानगीने १५० अभियंते, बीट निरिक्षक यांची नियुक्ती केली. शहरात अवैध बांधकामे होऊच नयेत ही जबाबदारी त्यांची होती. महानगरपालिकेचा लाख-लाख रुपये पगार घेऊनही या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली. खरे तर, आयुक्तांनी आता त्यांच्यावरही कारवाई केली पाहिजे. प्रशासकीय राजवटीत गेल्या तीन वर्षात शहरात किमान लाखभर अवैध बांधकामे, अतिक्रमणे झालीत त्यांची जबाबदारी बीट निरिक्षकांचीच आहे. त्यामुळे कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर कारवाई कधी? असा सवालदेखील उपस्थित होत आहे.

# बिबवेवाडी मेट्रो स्टेशनमुळे कात्रज मेट्रो प्रकल्पाला होणार उशीर

## पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट हा मेट्रो मार्ग सुरु करण्यात आला आहे. त्यानंतर हाच मार्ग पुढे कात्रजपर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वारगेट ते कात्रज या मेट्रोच्या विस्तारित मार्गात बालाजीनगर-धनकवडीपाठोपाठ आता आणखी एका स्थानकाचा समावेश करण्याचा निर्णय महामेट्रोकडून घेण्यात आला आहे. त्यामुळे यासाठीच्या निविदा नव्याने काढण्यात येणार आहेत. तसेच, सुधारित आराखडा मंजुरीसाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठविला जाणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या कामाला विलंब होणार आहे. बिबवेवाडी येथे नवीन मेट्रो स्टेशन उभारले जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट हा मेट्रो मार्ग सुरू करण्यात आला आहे. त्यानंतर हाच मार्ग पुढे कात्रजपर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्वारगेट ते कात्रज हा सुमारे साडेपाच किलोमीटरचा मेट्रोचा विस्तारित मार्ग असणार आहे. या मूळ आरखड्यात मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज अशा तीन स्थानकांचा समावेश होता. मात्र, तीन स्थानकांमध्ये अंतर अधिक असल्याने तसेच धनकवडी परिसरातील नागरिकांना याचा फायदा व्हावा, यासाठी एक स्थानक वाढविण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार संपूर्ण अभ्यास करून महामेट्रोने दोन महिन्यांपूर्वी बालाजीनगर या नवीन स्थनकाला मान्यता दिली होती.

उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी या मेट्रो मार्गाचा आढावा घेतला. त्या वेळी या मार्गावर बिबवेवाडी येथेही स्थानक करण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार महामेट्रोने पुन्हा एक स्थानक वाढविण्याचा आराखडा तयार केला आहे. त्याचा सुधारित प्रस्ताव महापालिकेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

याला महापालिकेच्या मुख्य सभेत नुकतीच मान्यता देण्यात आली आहे. या दोन नवीन स्टेशनमुळे मेट्रो प्रकल्पाचा खर्च ६८३ कोटींनी वाढणार आहे. तसेच, या वाढीव खर्चास पुन्हा राज्य आणि केंद्र सरकारची मान्यता घ्यावी लागणार आहे. यामध्ये वेळ जाणार असल्याने या मेट्रोला उशीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### खर्च 683 कोटींनी वाढला

» स्वारगेट ते कात्रज या विस्तारित मेट्रो मार्गाच्या जुन्या आराखड्यानुसार या प्रकल्पासाठी २ हजार ९५४ कोटींचा खर्च येणार होता. मात्र, नव्याने प्रस्तावित करण्यात आलेल्या दोन स्थानकांमुळे हा खर्च ६८३ कोटींनी वाढून ३ हजार ६३७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. या विस्तारित मार्गासाठी महापालिकेला या प्रकल्पासाठी १८१ कोटी रुपयांचा खर्च द्यावा लागणारा होता. त्यामध्येही ६८ कोटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे महापालिकेला आता २५० कोटी होणार आहे.

# न्यायालय नव्हे, भूलभुलैया! न्यायालयातील कोर्टरूम शोधताना मोठी दमछाक

## न्यायाधीशांच्या बदलीनंतरही पाट्यांवर नाव लावण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा व सत्र न्यायालयात कोर्टरूम व नियुक्त न्यायाधीशांची माहिती दर्शविणाऱ्या फलकाची दुरवस्था झाल्याने कोर्टरूम शोधताना पक्षकारांसह वकिलांची मोठी दमछाक होत आहे. आवारातील बहुतांश फलकांवरील नावे अस्पष्ट असून, न्यायाधीशांची बदली झाल्यानंतरही नवीन न्यायाधीशांची नावे फलकावर लावण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे न्यायालयीन कामकाजासाठी आलेल्या पक्षकारांसाठी न्यायालय सध्या भूलभुलैया ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शिवाजीनगरमधील जिल्हा व सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाजासाठी दररोज हजारो नागरिकांची न्यायालयात ये-जा सुरू असते. आवारात एक नवीन, तर तीन जुन्या दगडी इमारती आहेत. त्यापैकी नवीन इमारतीतील जिन्यालगत लावण्यात आलेल्या फलकाची दयनीय अवस्था झाली आहे. फलकांवरील नावे अस्पष्ट झाली असून.बदलीनंतरही न्यायाधीशांची नावे फलकावर बदलण्यात आलेली नाहीत.

त्यामुळे कोर्टरूम शोधण्यासाठी पक्षकारांना न्यायालयाचे प्रत्येक मजले पालथे घालावे लागत आहेत. याखेरीज आजूबाजूला असलेल्या लोकांकडे कोर्टरूमबाबत विचारणा करावी लागत आहे. नवीन इमारतीखेरीज स्मॉल कॉज कोर्ट व दिवाणी इमारतीतही काही स्वरूपात अशीच परिस्थिती आहे. न्यायाधीशांचे कोर्टरूम बदलल्यानंतरही त्यांची नावे बदलण्यात आलेली दिसून येत नाहीत.

मुख्य इमारतीतील फलक सुस्थितीत आहेत. मात्र, या ठिकाणी तळमजल्यावरील कोर्टरूम व पहिल्या मजल्यावरील कोर्टरूम याबाबत माहिती दिसून येत नाही. न्यायाधीशांची बदली होऊन एक महिना उलटूनही फलकावर नाव न बदल्याने फलकावरील नावानेच पक्षकार कोर्टाचा शोध घेत आहेत. मात्र, प्रत्यक्षात कोर्टरूमबाहेर नवनियुक्त न्यायाधीशांच्या नावाचा फलक दिसून येत आहे. परंतु, प्रत्यक्ष फलकावरील नावानुसार कोर्टरूम शोधताना पक्षकारांना संपूर्ण न्यायालयाची पायपीट करावी लागत आहे.




### कोर्ट शोधताना पोस्टमनच्याही नाकीनऊ

» टपाल विभागात न्यायालयासंदर्भात आलेले टपाल पोहचविण्याचे काम करण्यात येते. जवळपास महिनाभरापासून मी न्यायालयात टपाल वितरणाचे काम करतो. नवीन असल्यामुळे मी न्यायालयातील बोर्ड पाहून टपाल वितरित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बहुतांश ठिकाणी ते कोर्ट आढळून न आल्याने टपाल पोहचविण्यात अडचणी येत होत्या. मात्र, वकिलांच्या निवडणुकांमध्ये प्रचारासाठी वाटण्यात आलेल्या पत्रकात कोर्टरूम व संबंधित न्यायाधीशांची नावे नमूद होती. त्या पत्रकाआधारे आता काम सोपे झाल्याची माहिती टपाल विभागातील पोस्टमनने नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

“ न्यायाधीशांची बदली झाल्यानंतर नवनियुक्त न्यायाधीशांचे नाव तत्काळ फलकावर लावण्याची आवश्यकता आहे. आजही बहुतांश न्यायालयांची बदली झाल्यानंतरही फक्त कोर्टरूमबाहेरील फलकावर नाव बदलण्यात येते. मात्र, दर्शनी भागात लावलेल्या फलकावरील नाव बदलण्याकडे दुर्लक्ष होते. याखेरीज, फलक हे इमारतीच्या प्रवेशद्वारावर लावल्यास पक्षकार सर्व इमारतीत फिरत बसणार नाही. त्यामुळे न्यायालयात विनाकारण होणारी गर्दीही कमी होईल.

- ॲड. आकाश मुसळे, माजी सदस्य, पुणे बार असोसिएशन

“ जामिनासंदर्भात कामासाठी न्यायालयात आलो होतो. त्यासाठी नवीन इमारतीतील कोर्टात येण्यास सांगितले. इमारतीत आल्यानंतर मोबाईल लागला नाही. या वेळी जिन्याजवळील फलक पाहिला. मात्र, त्याद्वारे काही समजले नाही. अखेर, न्यायालय आवाराबाहेर येऊन परत कॉल केला. तेव्हा मला कोर्टाचे नाव समजले. मात्र, ते नाव मी पाहिलेल्या फलकावर नव्हते.

- विशाल कांबळे, पक्षकार

# अवसरी बुद्रुक गावात ओढे खोलीकरणाचे काम सुरू; टाटा मोटर्स व नाम फाउंडेशनचे सहकार्य

## तीन पोकलेन मशीनच्या सहाय्याने 8 किलोमीटर ओढ्याचे खोलीकरण काम पूर्ण झाल्यानंतर 350 ते 400 एकर क्षेत्र बागायती होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे टाटा मोटर्स व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पाझर तलाव, बंधारे खोलीकरण व गाळ काढणे कामाला सुरुवात झाली आहे. तीन पोकलेन मशीनच्या सहाय्याने ८ किलोमीटर ओढ्याचे खोलीकरण काम पूर्ण झाल्यानंतर ३५० ते ४०० एकर क्षेत्र बागायती होणार आहे. अवसरी हे गाव पाणीदार गाव होणार असल्याची माहिती सरपंच सारिका हिंगे यांनी दिली.

अवसरी बुद्रुक गावच्या सरपंच सारिका हिंगे, उपसरपंच अनिल हिंगे पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत वाडेकर, कल्याण हिंगे यांनी गेली सहा महिन्यापासून टाटा मोटर्स व नाम फाउंडेशन यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून अवसरी गावातील गावचा मुख्य ओढा, हिंगे वस्ती, शेटेमळा, गुनगे मळा, वरचा हिंगे मळा, भोकरशेत, चव्हाणमळा, चवरेमळा, येलभरमळा यांसह परिसरातील ओढ्यांचे खोलीकरण करण्याची मागणी केली होती.

या मागणीचा विचार करून टाटा मोटर्स व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तीन पोकलेन मशीनच्या सहाय्याने ओढा खोलीकरण कामाला सुरुवात झाली आहे. या कामाचा शुभारंभ सरपंच सारिका हिंगे, उपसरपंच अनिल हिंगे पाटील, ग्रामपंचायत सदस्य कल्याण हिंगे पाटील, चंद्रकांत गुनगे, मनीषा हिंगे, भीमाशंकर साखर कारखान्याचे संचालक शांताराम हिंगे पाटील, सोसायटीचे चेअरमन ज्ञानेश्वर येलभर यांच्या हस्ते उद्घाटन करून ओढा खोलीकरण कामाला सुरुवात झाली.

उन्हाळ्याचे तीन महिन्यात शेतीच्या पाण्याची तीव्रता अधिक जाणवत होती. त्यामुळे ग्रामपंचायतच्या वतीने टाटा मोटर्स व नाम फाउंडेशन यांच्या कार्यालयाशी संपर्क साधल्यानंतर दोन दिवसापूर्वी टाटा मोटर्स फाउंडेशनच्या वतीने गावात तीन पोकलेन मशीन पाठवण्यात आले असून प्रत्यक्ष ओढे खोलीकरण कामाला सुरुवात झाली आहे पाझर तलाव, बंधारे खोलीकरण व गाळ काढणे कामाला सुरुवात झाली आहे. तीन पोकलेन मशीनच्या सहाय्याने ८ किलोमीटर ओढ्याचे खोलीकरण काम पूर्ण झाल्यानंतर ३५० ते ४०० एकर क्षेत्र बागायती होणार आहे..



### खोलीकरणाचा चारशे एकरला लाभ...

» या माध्यमातून आठ किलोमीटर ओढ्याचे खोलीकरण होऊन डिंभे उजवा कालव्याचे पाणी ओढ्यात सोडल्यानंतर साडेतीनशे ते चारशे एकर क्षेत्राला लाभ होणार आहे. उन्हाळ्यात पाणी साचून जवळ पासच्या विहिरींची पाण्याच्या पातळीत वाढ होण्यासही मदत होणार असल्याचे उपसरपंच अनिल हिंगे पाटील यांनी सांगितले.